# कुसुमाग्रज जयंती

विवेकानंद कॉलेज (स्वायत्त) , कोल्हापूर

सूचना

मराठी विभाग

मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती

२७ फेब्रुवारी २०१९

**No.NB/**१५४७/२०१८-१९ दिनांक : १६.०२.२०१९

---

महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींना सूचित करण्यांत येते की, दि.२७.०२.२०१९ रोजी मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती निमित्त शासनाच्या वतीने मराठीतील दर्जेदार म्हणी स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.. तरी विद्यार्थ्यांनी आपले नाव, वर्ग, रोलनंबर व मोबाईल नंबर यासह मराठीतील नवीन किमान दहा म्हणी एका कागदावर सुवाच्य हस्ताक्षरात लिहून प्रा बी के गोसावी / डॉ प्रदीप पाटील / प्रा डॉ शर्मिला घाटगे यांच्याकडे दिनांक २५.०२.२०१९ पर्यंत द्यावयाच्या आहेत. या म्हणी स्पर्धेतील उत्कृष्ठ पाच स्पर्धकांना प्रशस्ती पत्र व पुस्तक भेट देऊन गौरविण्यात येणार आहे.

यावेळी **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** (१ ते १५ जानेवारी २०१९) यामध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धातील विजेत्यांनाही प्रशस्ती पत्र व पुस्तक भेट देऊन गौरविण्यात येणार आहे. त्यांनीही या कार्यक्रमास उपस्थित राहावयाचे आहे.

( प्रा. बी. के. गोसावी )

मराठी विभाग प्रमुख

**मराठी विभाग प्रमुख**

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)**

( डॉ. एस. वाय. होनगेकर )

प्राचार्य

विवेकानंद कॉलेज

कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर

***मराठी विभाग आयोजित***

# मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती

बुधवार दि. २७ फेब्रुवारी २०१९

## कार्यक्रम पत्रिका

- प्रतिमा पूजन : मान्यवरांच्या हस्ते
  ( कवी कुसुमाग्रज, शि.म.डॉ.बापूजी साळुंखे व संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे )
- मराठी अभिमान गीत गायन : 'लाभले आम्हास भाग्य' समूह गायन
- प्रास्ताविक व स्वागत : प्रा. बी. के. गोसावी
- मा.प्राचार्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण : मराठी भाषा पंधरवडा १ ते १५ जानेवारी २०१९
- अध्यक्षीय भाषण : मा. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर
- आभार : प्रा. डॉ. प्रदीप पाटील
- सूत्रसंचालन : कु. स्वाती शेटके
- उपक्रमांचे उपयोजन :
  १)विद्यार्थ्यांचे भ्रमणध्वनीवर मराठीत टंकलेखन - वेगवेगळे ॲप्स उतरवून घेणे.
  २)संगणकावर मराठी - युनिकोड मराठीचा वापर करुन मा.शिक्षणमंत्री नाम.विनोदरावजी तावडे यांना संगणकाव्दारे मेल पाठविणे.

दिनांक : २७.०२.२०१९
वेळ : सकाळी ७.३० वाजता
स्थळ : रुम नंबर १४

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

Jr. College Recog. No. H.S.C./1074/R-1/DT : 8-8-1976
Jr. College Code No. 23-09-002

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Estd. : June 1964

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर

२१३०, ई ताराबाई पार्क, कोल्हापूर, जि. कोल्हापूर - ४१६ ००३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत

नॅक मानांकन : "A" (सी.जी.पी.ए. ३.२४) दि. १९-०१-१६ (तिसरी फेरी)
कॉलेज उईथ पोटेन्शिअल फॉर एक्सलन्स यु.जी.सी., (दोनदा)
स्टार कॉलेज - डी.बी.टी. - भारत सरकार

GOLDEN JUBILEE YEAR 2013-14

Ph. : 0231-2658612, 2658840 Fax : 0231-2658840 Resi.: 0231-2653962 Website : www.vivekanandcollege.org E-mail : info@vivekanandcollege.org

| संस्थापक | अध्यक्ष | कार्याध्यक्ष | सचिव | प्राचार्य |
|---|---|---|---|---|
| डॉ. बापूजी साळुंखे | मा. ना. चंद्रकांत दादा पाटील | प्राचार्य अभयकुमार साळुंखे | प्राचार्या सौ. शुभांगी गावडे | डॉ. एस. वाय. होनगेकर |
| D. Lit. | महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम मंत्री, (सार्वजनिक उपक्रम वगळून) महाराष्ट्र राज्य | M.A. | M.Sc., B.Ed. | M.A., M.Ed., P.G.D.T.E., M.Phil., Ph.D. |

जावक क्रमांक व्हि.सी.के/ 3573/28/2/2019 दिनांक : 25/02/2019

प्रति,
मा. शिक्षण सहसंचालक
उच्च शिक्षण संचलनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे. ४११००१

विषय : मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती अहवालाबाबत
संदर्भ : आपले पत्र क्र. उशिसं/मवि-१/मराठी भाषा गौराव दिन/२०१९/२२६३ दि. १५.२.२०१९

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयात दिनांक २७.२.२०१९ रोजी मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती साजरी करण्यात आली. त्याचा अहवाल , फोटो व इतर माहिती आपल्या माहितीसाठी सोबत जोडून पाठवत आहे. स्वीकार व्हावा व पोहोच मिळावा ही विनंती.

सदरची माहिती व अहवाल, फोटोसह दि.२७.२.२०१९ रोजी आपल्या सुचनेनुसार unicode.vinodtawade@gmail.com या ई पत्त्यावर पाठविणेत आली आहे.

कळावे,

आपला विश्वासू ,

(डॉ. एस. वाय. होनगेकर)
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

प्रत माहितीसाठी :-
१) मा. विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण , कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
२) मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

G:All Jt.Dir/Med let

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार " - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर

***मराठी विभाग आयोजित***

**मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती**

बुधवार दि. २७ फेब्रुवारी २०१९

अ ह वा ल

महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे पत्र क्र उशिसं/मवि-१/मराठी भाषा गौरव दिन २०१९ /२२६३ दि.१३.२.२०१९ व मा. विनोद तावडे , शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दि.८.२.२०१९ चे पत्रानुसार विवेकानंद कॉलेज (स्वायत्त) कोल्हापूर येथे दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ रोजी **मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती** साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.वाय.होनगेकर यांना निमंत्रित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागाचे प्रमुख प्रा.बी.के.गोसावी होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख वक्त्यांनी मराठी भाषेचे महत्व विशद करुन मराठी भाषा संवर्धनाच्या दिशा अधोरेखित केल्या. कार्यक्रमाची सुरुवात कविवर्य कुसुमाग्रज, शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे व संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमापूजन व संस्था प्रार्थनेने करण्यात आली. याप्रसंगी सुरेश भट लिखित **लाभले आम्हास भाग्य , बोलतो मराठी** या गौरवगीताचे गायन करण्यात आले.

या महाविद्यालयामध्ये दि. १ ते १५ जानेवारी २०१९ दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वक्तृत्व, निबंध, अभिवाचन, काव्यवाचन, गीतगायन, वादविवाद तसेच मराठी म्हणी वाचन स्पर्धा घेण्यात आल्या. यातील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पुस्तके देऊन गौरविण्यात आले.

मराठी भाषा दिना निमित्त उत्कृष्ट म्हणींचे अर्थासहित वाचन करण्यात आले. तसेच मराठीतील प्रसिध्द साहित्यिक पु.ल.देशपांडे यांच्या बटाटयाची चाळ या पुस्तकातील उताऱ्याचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा डॉ प्रदीप पाटील यांनी केले. आभार कु प्रिया बुराण, बी ए भाग १ हिने मानले. सूत्रसंचालन कु स्वाती शेटके, बी ए भाग ३ हिने केले. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा डॉ प्रभावती पाटील, प्रा एस एम रुईकर, तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

मराठी विभागाच्या वतीने वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. वाङ्.मय मंडळाच्या वतीने मान्यवर वक्त्यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. तसेच दर शनिवारी विद्यार्थ्यांसाठी वाचन कट्टयाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयात विद्यार्थी मंडळ गठित केले असून त्यानुसार मराठीतील दर्जेदार पुस्तकांची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. वरीलप्रमाणे मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती २७ फेब्रुवारी २०१९ चा अहवाल आपणाकडे सुपुर्द करीत आहोत.

**प्रा. बी. के. गोसावी**
मराठी विभाग प्रमुख

**मराठी विभाग प्रमुख**
**विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर (स्वायत्त)**

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR

**डॉ. एस. वाय. होनगेकर**

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार " - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे**

**विवेकानंद कॉलेज (स्वायत्त) कोल्हापूर**

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा : १ जानेवारी २०१९ ते १५ जानेवारी २०१९**

**विविध स्पर्धा पारितोषिक वितरण**

**मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती २७.०२.२०१९**

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नांव | वर्ग | क्रमांक |
|---|---|---|---|
| | **वक्तृत्व स्पर्धा** | | |
| १ | सौरभ संजय पाटील | बी एस्सी ३ | प्रथम क्रमांक |
| २ | ऐश्वर्या राजू दाडमोडे | बी बी ए १ | व्दितीय क्रमांक |
| ३ | प्रिया पांडुरंग बुराण | बी ए १ | तृतीय क्रमांक |
| | **काव्यवाचन स्पर्धा** | | |
| ४ | उत्कर्ष यशवंत केसरकर | बी ए. १ | प्रथम क्रमांक |
| ५ | किरण हणमंत हेटकळे | बी ए. १ | व्दितीय क्रमांक |
| ६ | प्रिया पांडुरंग बुराण | बी ए १ | तृतीय क्रमांक |
| | **निबंध स्पर्धा** | | |
| ७ | अभिषेक नरसिंगराव केसरकर | बी एस्सी १ | प्रथम क्रमांक |
| ८ | सौरभ संजय पाटील | बी एस्सी २ | व्दितीय क्रमांक |
| ९ | पूनम बाळासो कुंभार | बी ए १ | तृतीय क्रमांक |
| १० | राजनंदिनी रमेश साळोखे | बी ए १ | |
| | **अभिवाचन स्पर्धा** | | |
| ११ | ऐश्वर्या राजू दाडमोडे | बी बी ए १ | प्रथम क्रमांक |
| १२ | उत्कर्ष यशवंत केसरकर | बी ए. १ | व्दितीय क्रमांक |
| १३ | रुनाली रोहिदास नांद्रेकर | बी ए ३ | तृतीय क्रमांक |
| | **गीतगायन स्पर्धा** | | |
| १४ | सुप्रिया आडकुरकर | बी एस्सी १ | प्रथम क्रमांक |
| १५ | मुस्कान मुजावर | बी ए. १ | व्दितीय क्रमांक |
| १६ | मानसी गणेश अभ्यंकर | बी एस्सी १ | तृतीय क्रमांक |
| | **वादविवाद स्पर्धा** | | |
| १७ | सौरभ संजय पाटील | बी एस्सी २ | प्रथम क्रमांक |
| १८ | विवेक प्रकाश जंगम | बी एस्सी २ | |
| १९ | उत्कर्ष यशवंत केसरकर | बी ए. १ | व्दितीय क्रमांक |
| २० | किरण हणमंत हेटकळे | बी ए. १ | |
| २१ | जयेश संभाजी पिंजरे | बी ए. १ | तृतीय क्रमांक |
| २२ | योगेश यशवंत डेळेकर | बी ए. १ | |
| | **मराठी म्हणी स्पर्धा - मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जयंती २७.०२.२०१९** | | |
| २३ | अनुजा अविनाश कारीदकर | बी ए ३ | प्रथम क्रमांक |
| २४ | नेहा संजय महापुरे | बी ए १ | व्दितीय क्रमांक |
| २५ | आदित्य दिवाकर लातुरकर | बी ए १ | तृतीय क्रमांक |
| २६ | समृध्दी नंदकुमार चव्हाण | बी ए १ | उत्तेजनार्थ |

(प्रा बी के गोसावी)
मराठी विभाग प्रमुख
**मराठी विभाग प्रमुख**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)**

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 416003

(डॉ. एस. वाय. होनगेकर)
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

Vivekanand College, Kolhapur

Vivekanand College <info@vivekanandcollege.org>

575

## Marathi Bhasha Gourav Din details

2 messages

---

**Vivekanand College** <info@vivekanandcollege.org>
To: unicode.vinodtawde@gmail.com, mavi.dhepune@nic.in
Cc: jdhekop <jdhekop@gmail.com>, registrar@unishivaji.ac.in, Bhau Gosavi <bhaugosavi101@gmail.com>, syhongekar13 <syhongekar13@gmail.com>

Wed, Feb 27, 2019 at 1:26 PM

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे
विवेकानंद कॉलेज (स्वायत्), कोल्हापूर

दिनांक : 27.02.2019

प्रति,
मा. नामदार विनोद तावडे
मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,
उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा सांस्कृतिक कार्य,
महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई 400 032

विषय : अहवाल व संदेशाबाबत - मराठी भाषा गौरव दिन तथा कवीवर्य कुसुमाग्रज जयंती

महोदय,


आमच्या विवेकानंद कॉलेजमध्ये आज दिनांक 27.2.2019 रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन - कवीवर्य कुसुमाग्रज जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.वाय.होनगेकर हे होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा बी के गोसावी होते. प्रमुख वक्त्यांनी मराठी भाषेचे महत्व् विशद करून मराठी भाषा विकासाच्या दिशा अधारेखित केल्या. कार्यक्रमाची सुरुवात कवीवर्य कुसुमाग्रज, शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे, संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमापूजनाने व संस्था प्रार्थनेने करणेत आली. यावेळी मराठी भाषेचे महत्व सांगणारे ' लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी ' हे गौरवगीत सादर करण्यात आले.

याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (1 ते 15 जानेवारी) निमित्त घेणेत आलेल्या वकृत्व, निबंध, काव्यवाचन, गीतगायन, अभिवाचन,वादविवाद तसेच मराठी म्हणी स्पर्धातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पुस्तके व प्र[illegible]ीपत्र देऊन करणेत आला. उत्कृष्ठ म्हणीचे अर्थासहित वाचन करण्यात आले तसेच मराठीतील प्रसिध्द साहित्यिक पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यकृतीचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.डॉ.प्रदीप [illegible] यांनी केले. आभार कु. प्रिया बुराण हिने मानले. सुत्रसंचालन कु. स्वाती शेटके हिने केले. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ प्रभावती पाटील, प्रा. एस. एम. रुईकर, प्राध्यापक व विद्यार्थी,विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

(डॉ. एस. वाय. होनगेकर)
प्राचार्य,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

---

**4 attachments**



Vivekanand College Kolhapur.jpg
3451K



Vivekanand College Kolhapur 1.jpg
3791K

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD. JUNE 1964



Vivekanand College Kolhapur3.jpg
3619K

प्रा० गोसावी



Vivekanand College Kolhapur2.jpg
3502K

---

**विनोद तावडे** <unicode.vinodtawde@gmail.com>
To: Vivekanand College <info@vivekanandcollege.org>

Fri, Mar 8, 2019 at 12:10 PM

मराठी भाषा दिन २०१९ आपण उत्साहाने आणि गांभीर्यपूर्वक साजरा केल्याबद्दल मनस्वी आनंद झाला. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासात यापुढेही आपले असेच सहकार्य लाभेल, याची खात्री आहेच!

[Quoted text hidden]

--

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे
विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर

दिनांक : 27.02.2019

प्रति,
मा. नामदार विनोद तावडे
मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,
उच्च् व तंत्र शिक्षण, मराठी भाषा सांस्कृतिक कार्य,
महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई 400 032

विषय : अहवाल व संदेशाबाबत - मराठी भाषा गौरव दिन तथा कवीवर्य कुसुमाग्रज जयंती

महोदय,

आमच्या विवेकानंद कॉलेजमध्ये आज दिनांक 27.2.2019 रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन - कवीवर्य कुसुमाग्रज जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.वाय.होनगेकर हे होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा बी के गोसावी होते. प्रमुख वक्त्यांनी मराठी भाषेचे महत्व् विशद करुन मराठी भाषा विकासाच्या दिशा अधारेखित केल्या. कार्यक्रमाची सुरुवात कवीवर्य कुसुमाग्रज, शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे, संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमापूजनाने व संस्था प्रार्थनेने करणेत आली. यावेळी मराठी भाषेचे महत्व् सांगणारे ' **लाभले आम्हास भाग्य् बोलतो मराठी** ' हे गौरवगीत सादर करण्यात आले.

याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (1 ते 15 जानेवारी) निमित्त् घेणेत आलेल्या वक्तृत्व्, निबंध, काव्य्वाचन, गीतगायन, अभिवाचन,वादविवाद तसेच मराठी म्हणी स्पर्धातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पुस्तके व प्रशस्तीपत्र देऊन करणेत आला. उत्कृष्ठ म्हणीचे अर्थासहित वाचन करण्यात आले तसेच मराठीतील प्रसिध्द साहित्यिक पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यकृतीचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.डॉ.प्रदीप पाटील यांनी केले. आभार कु. प्रिया बुराण हिने मानले. सुत्रसंचालन कु. स्वाती शेटके हिने केले. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ प्रभावती पाटील, प्रा. एस. एम. रुईकर, प्राध्यापक व विद्यार्थी,विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

(डॉ. एस. वाय. होनगेकर)
प्राचार्य,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 416003

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

# वाचनाने व सुसंवादाने वाढेल मराठीची श्रीमंती

- प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

कोल्हापूर दि.27: मराठी भाषेला समृध्द करण्यासाठी मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. संपूर्ण महाराष्ट्रभर कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंती दिनाचे औचित्य् साधून मराठी वाड.मयाच्या या गौरव दिनाचा सर्वानीच विचार केला पाहिजे. मराठी भाषेची समृध्दी वाढवायची असेल तर वाचना इतकेच सुसंवादाला देखील महत्व् आहे. मराठी भाषेत खूप बारकावे आहेत. ते बोलण्याने समजून येतात. यासाठी ऐकण्याची क्षमता व वाचनाची गोडी प्रत्येकाने वाढविली पाहिजे. तरच मराठी भाषा महाराष्ट्रामध्ये टिकून राहील व ती सातासमुद्रापार जाईल. असे विचार विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले. ते मराठी विभाग आयोजित मराठी भाषा गौरव दिन - कवीवर्य कुसुमाग्रज जयंती व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा.बी के गोसावी हे होते.

प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर पुढे म्हणाले की, जगातील सर्व भाषा संगणकीय परिक्षेत्रात येत आहेत व त्या दिवसेंदिवस बदलत आहेत. मराठी भाषेतील म्हणी, अलंकार व शब्दाच्या विविध अर्थछटा समजून घ्यायच्या असतील तर मराठी माणसांनी आपल्या भाषेचा योग्य् तो वापर करुन बदलते तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्रा.बी.के.गोसावी यांनी मराठीची सद्यस्थिती व मराठी साहित्याविषयी मार्मिक विवेचन केले. ते म्हणाले, मराठी भाषेने जगण्याचे सामर्थ्य भरभरुन दिले आहे. समाजाची बांधिलकी आणि संस्कृती याची जाणीव निर्माण करण्याचे माध्यम म्हणून भाषेकडे पाहिले पाहिजे. मराठीतील बोली व मराठी भाषा या सजग बनवायच्या असतील तर चांगले मराठी साहित्य् वाचले पाहिजे आणि मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त् करुन देण्यासाठी लेखन आणि संभाषणाची गरज आहे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाची सुरुवात कवीवर्य कुसुमाग्रज, शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे, संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमापूजनाने व संस्था प्रार्थनेने करणेत आली. यावेळी मराठी भाषेचे महत्व् सांगणारे ' **लाभले आम्हास भाग्य् बोलतो मराठी** ' हे गौरवगीत सादर करण्यात आले. याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (1 ते 15 जानेवारी) निमित्त् घेणेत आलेल्या वक्तृत्व, निबंध, काव्यवाचन, गीतगायन, अभिवाचन,वादविवाद तसेच मराठी म्हणी स्पर्धातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पुस्तके व प्रशस्तीपत्र देऊन करणेत आला. उत्कृष्ठ म्हणीचे अर्थासहित सादरीकरण व पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यकृतीचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.डॉ.प्रदीप पाटील यांनी केले. आभार कु. प्रिया बुराण हिने मानले. सुत्रसंचालन कु स्वाती शेटके हिने केले. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा डॉ प्रभावती पाटील, प्रा एस एम रुईकर, प्राध्यापक व विद्यार्थी,विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. ----------------------------------------------------------------------------------------------------

**विवेकानंद कॉलेज ( स्वायत ), कोल्हापूर**

जा.क्र.व्हीसीके/966/2018-19 दि.27.2.2019

प्रति,

मा.संपादकसो,

दैनिक -------------------------कोल्हापूर

विषय : बातमी प्रसिध्दी बाबत.

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती. कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. एस. वाय. होनगेकर)

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

O/C

प्रा. बी. के. गोसावी
मराठी विभागप्रमुख
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
दि. २६/०२/२०१९

प्रति,

मा. प्राचार्य सो,
विवेकानंद कॉलेज (स्वायत्त) कोल्हापूर

विषय - मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम साहित्य पुरविणे बाबत —

महोदय,

दि. २७ फेब्रुवारी २०१९ मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार रूम नं ७४ मध्ये पुढील साहित्याची पूर्तता करावी कार्यक्रम सकाळी ८.३० वाजता

१) 'कुसुमाग्रज' यांचा फोटो, सरस्वतीमाता व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा फोटो.
२) फोटोला हार . ३.
३) भाग खुर्च्या, टेबलवर ~~सफेद~~ कापड
४) फोटोग्राफी
५) झाडाची कुंडी व पाणी
६) फलक लेखन
७) माईक व्यवस्था

वरील प्रमाणे पूर्तता करावी
कळावे,

आपला विश्वासू
(स्वाक्षरी)
(प्रा. बी. के. गोसावी)

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-4160..

26/2/19

GoodLuck Page No.
Date

# विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर

## मराठी विभाग

## मराठी म्हणी स्पर्धा

मराठी भाषा गौरव दिन
कवी कुसुमाग्रज जयंती
२७ फेब्रुवारी २०१९

1) प्रथम क्रमांक – कु. अनुजा अविनाश कारिदकर
बी.ए. भाग-२
2) द्वितीय क्रमांक – कु. नेहा संजय महापुरे
बी.ए. भाग-१
3) तृतीय क्रमांक – श्री. आदित्य दिवाकर लातुरकर
बी.ए. भाग-१

4) उत्तेजनार्थ – कु. समृद्धी नंदकुमार चव्हाण
बी.ए. भाग-१

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD. JUNE 1964

लोकमत कोल्हापूर, गुरुवार, दि. २८ फेब्रुवारी २०१९

# वाचनाइतकाच सुसंवादही महत्त्वाचा

## एस. वाय. होनगेकर : 'विवेकानंद'मध्ये 'मराठी भाषा गौरव दिन'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मराठी भाषेची समृद्धी वाढवायची असेल तर वाचनाइतकेच सुसंवादालाही महत्त्व आहे. मराठी भाषेत खूप बारकावे आहेत. ते बोलण्याने समजून येतात. यासाठी प्रत्येकाने ऐकण्याची क्षमता व वाचनाची गोडी वाढविली पाहिजे; तरच मराठी भाषा महाराष्ट्रामध्ये टिकून राहील व ती सातासमुद्रापार जाईल, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले.

मराठी विभागातर्फे आयोजित मराठी भाषा गौरव दिन - कविवर्य कुसुमाग्रज जयंती व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. बी. के. गोसावी होते.

प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले की, जगातील सर्व भाषा संगणकीय परिक्षेत्रात येत आहेत व त्या दिवसेंदिवस बदलत आहेत. मराठी भाषेतील म्हणी, अलंकार व शब्दांच्या विविध अर्थछटा समजून घ्यायच्या असतील तर मराठी माणसांनी आपल्या भाषेचा योग्य तो वापर करून बदलते तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्रा. बी. के. गोसावी म्हणाले, समाजाची बांधीलकी आणि संस्कृती यांची जाणीव निर्माण करण्याचे माध्यम म्हणून मराठी भाषेकडे पाहिले पाहिजे.

यावेळी मराठी गौरवगीत सादर करण्यात आले. याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व, निबंध, काव्यवाचन, गीतगायन, अभिवाचन, वादविवाद तसेच मराठी म्हणी स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पुस्तके व प्रशस्तीपत्र देऊन करण्यात आला.

प्रा. डॉ. प्रदीप पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले. प्रिया बुराण हिने आभार मानले. स्वाती शेटके हिने सूत्रसंचालन केले. यावेळी इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रभावती पाटील, प्रा. एस. एम. रुईकर, प्राध्यापक व विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

पुढारी गुरुवार, २८ फेब्रुवारी २०१९

# मराठी भाषेच्या समृद्धीसाठी सुसंवादालाही महत्त्व : होनगेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भाषेला समृद्ध करण्यासाठी मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठीच्या समृद्धीसाठी वाचनाइतकेच सुसंवादालादेखील महत्त्व आहे. यासाठी ऐकण्याची क्षमता व वाचनाची गोडी प्रत्येकाने वाढविली पाहिजे. तरच मराठी भाषा राज्यात टिकून राहील, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले.

मराठी विभागातर्फे आयोजित मराठी भाषा गौरव दिन - कविवर्य कुसुमाग्रज जयंतीनिमित्त व्याख्यानात बोलत होते. मराठी विभागप्रमुख प्रा. बी. के. गोसावी अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य होनगेकर म्हणाले, जगातील सर्व भाषा संगणकीय परिक्षेत्रात येत आहेत. त्या दिवसेंदिवस बदलत आहेत. आपल्या भाषेचा योग्य वापर करून बदलते तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.

प्रा. बी. के. गोसावी यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त करून देण्यासाठी लेखन आणि संभाषणाची गरज आहे, असे सांगितले. याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व, निबंध, काव्यवाचन, गीतगायन, अभिवाचन, वादविवाद तसेच मराठी म्हणी स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. प्रदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रिया बुराण हिने आभार मानले. स्वाती शेटके हिने सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. प्रभावती पाटील, प्रा. एस. एम. रूईकर यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते.

28/2/19

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

# कवी कुसुमाग्रज जयंती




प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. प्रदीप पाटील




प्रमुख पाहूणे मा. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर मार्गदर्शन करताना

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003